# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ३

सभावृत्तांत

दिनांक ०५/०६/२०१५ सकाळी ११.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जुन महिन्याची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०५/०६/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. अरुण मदन टाक | अध्यक्ष |
| २. | मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्या |
| ३. | मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | सदस्या |
| ४. | मा. श्री. रामदास बोकड | सदस्य |

----------

याशिवाय मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रिय अधिकारी, मा. रवींद्र जाधव, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. डॉ. सतीश गोरे, पशु वैद्यकीय अधिकारी, मा. श्री. ओंभासे, कार्यकारी अभियंता, झोनिपू, मा. व्ही. के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. एम.एस. इनामदार, लेखाधिकारी, मा. रत्नपारखी,उपअभियंता स्थापत्य, मा. भाऊसाहेब साबळे,उपअभियंता, मा. नितीन देशमुख, उपअभियंता विद्युत, मा. रवींद्र पवार, उप अभियंता, जलनि:सारण, मा.एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. कोतवडेकर एस. पी., मा. एस.ए. पाटील, मा. सोनवणे ए.सी., आरोग्य निरीक्षक इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सभापती** : सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

सन्मा. सदस्य यांच्या मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १ :** प्रभाग क्र. ४३ मध्ये पिंपरी कँप परिसरात लालबहादुर शास्त्री भाजी मंडई समोर पार्किंगच्या जागेवर ८ सीटचे व ४ सीटचे ०२ पे अँड युज तत्वावर सुलभ शौचालयाची व इतर प्रस्ताव मंजुर करुन करारनामा करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावानुसार त्वरीत बांधकाम सुरु करण्यात यावे.

**विषय क्र.** २ : पिंपरी येथील वॉर्ड क्र. ४४ येथील जुना ड प्रभाग शाळेजवळील चौकाला नाव नसल्याने व तेथे पाच रस्ते एकत्रित येऊन मिळत असल्याने या चौकाला पंचशील चौक असे नामकरण करणेत यावे.

**विषय क्र.** ३ :प्रभाग क्र. ४३ मध्ये राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी तसेच शहर फेरीवाला समितीमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.४१७५/२००२,४१७६/२००२,४१६१/२००२, ४१६२/ २००२ यामध्ये दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यात यावे. तसेच ब प्रभागामध्ये मंजुर नो हॉकर्स झोनच्या मंजुर प्रस्तावाची अंमलबजावणी करणे

**विषय क्र.** ४ : ड प्रभाग समितीची मासिक सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी सकाळी ११.०० वा. घेणेत येते. सदर सभा सकाळी ११.०० ऐवजी दुपारी १२.०० वा. घेणेत यावी.

मा. सदस्या ड प्रभाग समिती सौ. आरती सुरेश चोंधे, सदस्य यांनी पुढीलप्रमाणे सुचना मांडली.

दिनांक ५/६/२०१५ रोजीची सभा गणसंख्येअभावी तसेच ब-याच अधिका-यांच्या बदल्या झाल्या असल्याचे कारणास्तव तहकुब करुन सदरची सभा दिनांक १९ /०६ /२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत यावी. सदर सुचनेस मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर सदस्या यांनी अनुमोदन दिले.

तदनंतर मा.सभापती यांनी आज दिनांक ०५/०६/२०१५ रोजीची ड प्रभाग समितीची माहे जुन महिन्याची सभा दिनांक १९/०६/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत असल्याचे प्रकट केले.

सही/-
(अरुण मदन टाक )
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

क्रमांक – ड/१३/कावि/ ६१/२०१५
दिनांक – ०७/०६/२०१५

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ३

सभावृत्तांत

दिनांक १९/०६/२०१५ सकाळी ११.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जुन महिन्याची तहकुब मासिक सभा शुक्रवार दिनांक १९/०६/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्री. अरुण मदन टाक | सभापती |
| २. मा. श्रीमती सविता धनराज आसवाणी | सदस्या |
| ३. मा. श्रीमती सुनिता राजेश वाघेरे | सदस्या |
| ४. मा. आसवाणी हिरानंद उर्फ डब्बु किंमतराम | सदस्य |
| ५. मा. श्रीमती उषा संजोग वाघेरे (पाटील) | सदस्या |
| ६. मा. श्रीमती विमल रमेश काळे | सदस्या |
| ७. मा. श्रीमती निता विलास पाडाळे | सदस्या |
| ८. मा. श्री. विनोद जयवंत नढे | सदस्य |
| ९. मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्या |
| १०. मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ११. मा. श्री. विलास एकनाथ नांदगुडे | सदस्य |
| १२. मा. श्रीमती शितल विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्या |
| १३. मा. श्री. बोकड रामदास गेणभाऊ | सदस्य |
| १४. मा. श्रीमती वैशाली राहुल जवळकर | सदस्या |
| १५. मा. श्री. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

----------

याशिवाय, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. श्री. ओंभासे, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, मा. नितीन देशमुख,प्र.कार्यकारी अभियंता विद्युत, मा. डॉ. सतीश गोरे, पशु वैद्यकीय अधिकारी, मा. व्ही. के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा.ए. टी.आव्हाळे, लेखाधिकारी, मा. रत्नपारखी,उपअभियंता स्थापत्य, मा. भाऊसाहेब साबळे,उपअभियंता, मा. रवींद्र पवार, उप अभियंता, जलनि:सारण, मा. अनघा पाठक, उपअभियंता, मा.एस.एस. गायकवाड,मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. इदे अनिल, कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. रोकडे जयवंत, कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. पाडवी, कनिष्ठ अभियंता, विद्युत, मा. जी. आर. गोसावी, सहा. उद्यान अधिक्षक, मा. डी. के. बैचे, हॉर्टी. सुपरवायझर, मा. जी.एन. खैरे, उद्यान सहाय्यक, मा. आंबेकर आर. एस. सर्व्हेअर, नगररचना, मा. खरात,सर्व्हेअर, कोतवडेकर एस. पी., मा. एस.ए. पाटील, मा. सोनवणे ए.सी., आरोग्य निरीक्षक इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सभापती** : सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

**मा.** सचिव, सभा शाखा : :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. २ दिनांक ०८/०५/२०१५ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील कार्यपत्रिका क्र. २ माहे मे २०१५ चा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**मा.** सचिव, सभा शाखा : सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने दिनांक ५/६/०१५ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. १ ठराव क्र. ६

दिनांक : १९/६/२०१५ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा. सविता धनराज आसवाणी अनुमोदक – मा. सुनिता राजेश वाघेरे

प्रभाग क्र. ४३ मध्ये पिंपरी कँप परिसरात मुख्य बाजारपेठ व भाजी मंडई आहे. येथे हजारो लोक व्यवसाय व खरेदी करणेसाठी येतात. म्हणुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने त्या लोकांसाठी सुलभ शौचालय व इतर व्यवस्था करणेसाठी लालबहादुर शास्त्री भाजी मंडई समोर पार्किंगच्या जागेवर ८ सीटचे व ४ सीटचे ०२ पे अँड युज तत्वावर सुलभ शौचालयाची व इतर प्रस्ताव मंजुर करुन करारनामा करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावानुसार त्वरीत बांधकाम सुरु करण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

-----------------

विषय क्र. २ ठराव क्र. ७

दिनांक : १९/६/२०१५ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा. सविता धनराज आसवाणी अनुमोदक – मा. सुनिता राजेश वाघेरे

प्रभाग क्र. ४३ मध्ये राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी तसेच शहर फेरीवाला समितीमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.४१७५/२००२,४१७६/२००२,४१६१/२००२, ४१६२/ २००२ यामध्ये दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यात यावे. तसेच ब प्रभागामध्ये मंजुर नो हॉकर्स झोनच्या मंजुर प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला

--------------

विषय क्र. ३ ठराव क्र. ८

दिनांक : १९/६/२०१५ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा. सुनिता राजेश वाघेरे अनुमोदक – मा. जवळकर वैशाली राहुल

पिंपरी येथील वॉर्ड क्र. ४४ येथील जुना ड प्रभाग शाळेजवळील चौकाला नाव नसल्याने व तेथे पाच रस्ते एकत्रित येऊन मिळत असल्याने या चौकाला पंचशील चौक असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

------------

विषय क्र. ४ ठराव क्र. ९

दिनांक : १९/६/२०१५ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा. राजेंद्र गणपत जगताप अनुमोदक – मा. उषा संजोग वाघेरे(पाटील)

ड प्रभाग समितीची मासिक सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी सकाळी ११.०० वा. घेणेत येते. सदर सभा सकाळी ११.०० ऐवजी दुपारी १२.०० वा. घेणेत येणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

-----------------

मा. सदस्यांनी खालील प्रमाणे विविध विभागांचे कामकाजाबाबत मत व्यक्त केले.

मा. अध्यक्ष श्री. टाक : -पिंपरी येथील टॉयलेट ब्लॉकचे काम अर्धवट परिस्थितीत बंद करण्यात आले.

उपअभियंता , स्थापत्य श्री. रत्नपारखी: - काही तांत्रिक अडचणींमुळे सदर ठिकाणचे काम बंद होते. आता पुन:श्च कामास सुरुवात केली आहे.

मा. सुनिता राजेश वाघेरे : पाणी पट्टी बिले वाटप व्यवस्थित होत नाही.

मा. कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा श्री. तांबे : पाणीबिले वाटपाचे कामकाज क्रॅनबेरी कंपनीमार्फत करण्यात येते.

मा. राजेंद्र जगताप : ज्या दुकानांबाहेर अतिक्रमण करण्यात येते वा फुटपाथवर अतिक्रमण करण्यात येते तेथील दुकानांचे मालक संबंधित अतिक्रमण करणा-याकडून भाडे वसुली करतात . तसेच जे अनधिकृत पत्र्याची शेड बांधतात अशा अनधिकृत बांधकामांवर कारवाई होत नाही. श्री. ओंभासे, कार्यकारी अभियंता यांनी बीआरटीएस प्रकल्पाचे काम ज्या पध्दतीने केले त्याप्रमाणे ड प्रभागाचे कामकाज करावे. अतिक्रमणाची कारवाई दर १५ दिवसानी सातत्याने करावी .

मा. आसवाणी हिरानंद उर्फ डब्बु किंमतराम :- मा. आयुक्त सो. यांनी दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

मा. निता पाडाळे : पंचनाथ कॉलनी येथील अतिक्रमणांमुळे नागरीकांना जा – ये करण्यास अडचणी होते. सदर बाबत मा. तापकीर अनिता यांनी दुजोरा दिला.

मा. राजेंद्र जगताप : डायनॉसॉर गार्डन ते काटे पुरम चौक पर्यंत रस्ता अतिक्रमणाने व्याप्त असतो. त्यामुळे पादचारी तसेच वाहनांना अडथळा होतो.

मा. रामदास बोकड – खाजगी वाहने /टेंपो फुटपाथवर पार्कींग केलेली निदर्शनास येतात. सदर अनधिकृत पार्किंगमुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. तसेच टेंपो व्यवसायिकांमुळे मध्यंतरीच्या काळात जो अपघात झाला त्यास सदर व्यवसायिक जबाबदार आहेत. पारस मेडिकल जवळील हातगाडीधारक यांचेवर तातडीने कारवाई करावी.

मा. जवळकर वैशाली: अनधिकृत टेंपो पार्किंगमुळे रस्त्यावर वाहतुक कोंडी होते. फेरीवाला धोरणाबाबत अद्यापही कार्यवाही प्रलंबित आहे.

मा. सचिव, सभा शाखा : अनधिकृत टेंपोवर कारवाई करण्याचे काम वाहतुक शाखेचे आहे. विभागाकडून आर.टी.ओ. ला रस्त्यावरील अनधिकृत टेंपोंबाबत या पूर्वी कळविण्यात आले आहे.

मा. कैलासभाऊ थोपटे : काळेवाडी मेनरोडला वाईन शॉपसमोर रस्त्यावर हातगाडयांवर दारु विकली जाते. सदर ठिकाणी संध्याकाळी ६ ते ९ दरम्यान कारवाई करण्यात यावी.

अनधिकृत बांधकामांच्या अनुषंगाने खालील प्रमाणे प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.

मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव : अनधिकृत बांधकामावरील कारवाईमुळे अतिक्रमण कारवाई करण्यासाठी पोलीस कर्मचारी उपलब्ध होत नव्हते. आता पोलीस उपलब्ध झाल्याने रस्त्यावरील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात येईल.

मा. राजेंद्र जगताप : पत्रा शेडवर कारवाई करणेत आलेली नाही. पोलीसांचे सहकार्याने पत्रा शेड काढण्याची कार्यवाही करावी.

मा. निता पाडाळे, मा. राजेंद्र जगताप : पशू वैद्यकीय विभागाचे कामाकरीता प्रत्येक प्रभागासाठी एक वाहन आवश्यक आहे.

मा. पशु वैद्यकीय अधिकारी : या महिन्याअखेर एक वाहन उपलब्ध होतिल.

आरोग्य विभागाचे कामकाजास अनुसरुन सन्मा. नगरसदस्य यांनी त्यांचे मत व्यक्त केले.

मा. विनोद नढे – अय्यप्पा मंदिराजवळील चेंबर उखडले आहे. ही बाब योग्य नाही.

मा. सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे – सदर ठिकाणचे चेंबर रस्त्याचे काम करताना खाली गेले असल्याने तेथील लाईन साफ करणे शक्य नसल्याने चेंबर फोडणे अत्यावश्यक झाले.

मा. राजेंद्र जगताप - पवना नदीपात्रातील हायसिंथ काढणेचे कामाचे बील संबंधित ठेकेदारास अदा करण्यात येऊ नये.

मा. सहा. आरोग्याधिकारी – ड प्रभागाकडील अहवाल आरोग्य मुख्य कार्यालयास पाठविणेत आला आहे.

पाणीपुरवठा विभागाचे कामकाजाबाबत चर्चा झाली.

मा. राजेंद्र जगताप : सन २०१२ नंतरचे नळ कनेक्शन देणेबाबत माहिती द्यावी. अनधिकृत नळकनेक्शनचे प्रमाण वाढले असुन खाजगी प्लंबर मार्फत कार्यवाही करण्यात येते. सदर बाब योग्य आहे का?

मा.रामदास तांबे : सन २०१२ नंतरचे अनधिकृत बांधकामांना सुविधा न देणेबाबत मा. आयुक्त सो. यांचे आदेश आहेत. प्लंबर कर्मचा-यांची कुमक कमी आहे. या कामी प्रस्ताव मा. आयुक्त सो. यांचेकडे सादर करण्यात येत आहे.

मा. अनिता मच्छिंद्र तापकीर : एक वेळ पाणीपुरवठा करणेबाबत नगरसदस्यांनी संमती दिलेली आहे. परंतु पाण्याच्या वेळेचे नियोजन व्यवस्थित नाही.

मा. निता पाडाळे – जलनि:सारण विभागाकडील कामांसाठी वारंवार पाठपुरावा करावा लागत असुन ठेकेदारांचे वर्तन योग्य नाही.

मा. उपअभियंता, जनि:सारण – ठेकेदार बदलण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

मा. सभापती – सर्व विभागप्रमुख यांनी पुढील प्रभाग समिती सभेचे वेळी दिनांक ३ जुलै २०१५ रोजी केलेल्या कार्यवाहीबाबत विभागनिहाय आढावा घेणेत येईल तरी सर्व विभागप्रमुख यांनी पाठपुरावा करुन कार्यवाही पूर्ण करुन घ्यावी व पुढील सभेचे वेळी माहिती द्यावी असे सांगुन सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(अरुण मदन टाक )
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

क्रमांक – ड/१३/कावि/ ६२ /२०१५
दिनांक – १४ /०७/२०१५

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती